दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | सोमवार, 6 जुलै 2026 | अंक क्र. 62 | वर्ष 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com


# खेळातून शिस्त... खाकीतून सेवा!

## ३६ वर्षांच्या कर्तव्यनिष्ठ राजाराम शेळके यांचा पत्रकार बांधवांनी केला सन्मान

■ परळी वैजनाथ | प्रतिनिधी

तब्बल ३६ वर्षे पोलीस दलात प्रामाणिक, शिस्तबद्ध आणि लोकाभिमुख सेवा बजावून सेवानिवृत्त झालेले पोलीस उपनिरीक्षक राजाराम शेळके यांचा परळीतील पत्रकार बांधवांच्या वतीने सत्कार करण्यात आला. आपल्या कर्तव्यनिष्ठ सेवेमुळे पोलीस दलाची प्रतिष्ठा उंचावणाऱ्या आणि माणुसकी जपणाऱ्या अधिकाऱ्याला विविध संपादक पत्रकार बांधवांनी त्यांचा सत्कार केला. या सोहळ्यास संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, परळी शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन गट्टूवार, निवृत्त पोलीस उपनिरीक्षक व्यंकटराव भताने, भाजप युवा मोर्चाचे युवक नेते तथा नगरसेवक निळकंठ चाटे यांच्यासह विविध क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मैदान गाजवणारा 'खाकी'तील खेळाडू !

■ राजाराम शेळके हे केवळ कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारीच नव्हे, तर एक उत्कृष्ट कबड्डीपटू म्हणूनही परिचित आहेत. आपल्या दमदार क्रीडा कौशल्याच्या जोरावर त्यांनी पोलीस दलात प्रवेश मिळवला. सेवाकाळात कठीण जबाबदाऱ्या सांभाळतानाही त्यांनी माणुसकी कायम जपली. यावेळी पत्रकारांच्या वतीने प्रा. रवींद्र जोशी यांनी शेळके यांच्या सेवाकाळातील अनेक आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्यकर्तुत्वाचा गौरव केला. सामान्य नागरिक, पत्रकार आणि सहकारी यांच्याशी त्यांनी नेहमीच आत्मीयतेचे संबंध ठेवले. कायदा-सुव्यवस्था राखताना त्यांचा अनुभव आणि संयमी स्वभाव नेहमीच मार्गदर्शक ठरला, अशा शब्दांत त्यांनी भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाला परळीतील विविध वृत्तपत्रांचे संपादक, प्रतिनिधी तसेच इलेक्ट्रॉनिक मीडियाचे पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी राजाराम शेळके यांना त्यांच्या निवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, आनंद आणि यशस्वी वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दैनिक पुण्यनगरीचे तालुका प्रतिनिधी धनंजय आरबुने यांनी केले.




# माजी आमदार भीमराव धोंडे यांना दिल्लीत 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार'

## प्रदान होणार; १० केंद्रीय मंत्र्यांची लाभणार उपस्थिती

■ आष्टी प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांना त्यांच्या गेल्या ४५ वर्षांतील शैक्षणिक, कृषी, सामाजिक, क्रीडा आणि राजकीय क्षेत्रातील अथांग कार्याबद्दल दिल्लीत प्रतिष्ठित 'महाराष्ट्र गौरव पुरस्काराने' सन्मानित करण्यात येणार आहे. नवभारत मीडिया ग्रुपच्या वतीने आयोजित या विशेष सोहळ्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, शिवराजसिंह चौहान, हरदीपसिंग पुरी, ज्योतिरादित्य सिंधिया, अनुप्रिया पटेल, प्रतापराव जाधव, श्रीपाद नाईक, मुरलीधर मोहोळ आणि माजी मंत्री स्मृती इराणी यांच्यासह १० केंद्रीय मंत्री आणि प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

बीड जिल्ह्यातील आष्टी सारख्या कायमस्वरूपी दुष्काळी भागात जन्मलेल्या भीमराव धोंडे यांनी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली. १९८० मध्ये अत्यंत कमी वयात पहिल्यांदा आमदार झालेल्या धोंडे यांनी सलग १५ वर्षे विधानसभा गाजवली. त्यानंतर २० वर्षांच्या प्रदीर्घ खंडानंतर २०१४ मध्ये भाजपच्या तिकिटावर पुन्हा विजयी होण्याचा अनोखा विक्रम त्यांनी केला. या कार्यकाळात त्यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा निधी आणून मतदारसंघातील रस्त्यांचा कायापालट



केला, ज्यामुळे त्यांना 'रस्ते महर्षी' ही ओळख मिळाली. दुष्काळी भागातील गोरगरीब कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी त्यांनी सुरू केलेल्या शैक्षणिक संस्थेचे आज ५० पेक्षा जास्त युनिट्स कार्यरत असून, यात वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी आणि नर्सिंग अशा विविध शाखांमध्ये ४० हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ग्रामीण भागातील रुग्णांसाठी मराठवाड्यातील सर्वात मोठे ५०० बेडचे कॅन्सर हॉस्पिटलही त्यांच्या माध्यमातून प्रगतीपथावर आहे. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आष्टी ते मुंबई आणि दिल्लीपर्यंत पायी मोर्चे काढणारे नेते म्हणून त्यांची ख्याती असून, बंद पडलेला 'महेश सहकारी साखर कारखाना' पुन्हा सुरू करून आणि शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून त्यांनी हजारो बेरोजगारांना रोजगार मिळवून दिला आहे. क्रीडा क्षेत्रात स्वतः राष्ट्रीय स्तरावर कुस्ती व कबड्डी गाजवलेल्या धोंडे यांच्या तालमीतूनच 'महाराष्ट्र केसरी' सईद चाऊस घडला आहे. या सर्व अष्टपैलू कार्याची दखल घेऊनच त्यांची या मानाच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.



# श्री स्वामी समर्थ इलेक्ट्रिक एजन्सीत अत्याधुनिक मशिनरीची भर

### आ. सुरेश धस यांच्या हस्ते पूजन

■ आष्टी (प्रतिनिधी)

महावितरणचे ठेकेदार किरण पोकळे यांनी आपल्या श्री स्वामी समर्थ इलेक्ट्रिक एजन्सीमध्ये अत्याधुनिक पोल उभारणी मशिनरीची भर घालत वीज पायाभूत सुविधांच्या कामांना अधिक गती देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या नवीन मशिनरीचे पूजन मराठवाडाभूषण लोकनेते तथा आमदार सुरेश धस यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

महावितरणच्या विविध योजनांतर्गत नवीन वीज वाहिन्या उभारणे, डीपी बसविणे, शेतीपंपांसाठी नवीन वीज जोडणी देणे, जीर्ण झालेले वीज खांब बदलणे तसेच वादळ, पाऊस किंवा नैसर्गिक आपत्तीनंतर नुकसानग्रस्त खांबांची तातडीने उभारणी करणे ही कामे या अत्याधुनिक मशिनरीच्या साहाय्याने अधिक जलद, सुरक्षित आणि अचूक पद्धतीने पूर्ण होणार आहेत. यामुळे मनुष्यबळावरील ताण कमी होऊन कामांची गुणवत्ता आणि सुरक्षितता वाढणार आहे.

या मशिनरीमुळे खांब उभारणीसाठी लागणारा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होणार असल्याने महावितरणच्या प्रलंबित कामांना गती मिळेल. परिणामी नवीन वीज जोडण्या, शेतीपंपांना वीजपुरवठा, ग्रामीण भागातील विद्युतीकरण आणि दुरुस्तीची कामे कमी कालावधीत पूर्ण होतील. आपत्कालीन परिस्थितीतही वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी ही मशिनरी प्रभावी ठरणार आहे.शेतकऱ्यांच्या दृष्टीनेही ही मशिनरी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. शेतीपंपांच्या नवीन वीज जोडण्या जलद मिळण्यास मदत होईल, खराब किंवा वाकलेले वीज खांब तातडीने बदलता येतील, वीजपुरवठ्यातील अडथळे कमी होतील आणि पिकांना वेळेवर सिंचनासाठी आवश्यक असलेला वीजपुरवठा सुरळीत राहण्यास मदत मिळेल. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ, श्रम आणि आर्थिक नुकसान कमी होऊन शेतीची कामे अधिक नियोजनबद्ध पद्धतीने करता येतील. यावेळी महावितरणचे अधिकारी, कर्मचारी, नातेवाईक, हितचिंतक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ.सुरेश धस यांच्यासह उपस्थितांनी किरण पोकळे यांच्या या आधुनिक उपक्रमाचे कौतुक करत, या मशिनरीमुळे महावितरणची विकासकामे अधिक वेगाने पूर्ण होऊन सर्वसामान्य नागरिक व शेतकरी यांना निश्चितच मोठा लाभ होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# जिल्हाभरत लोकप्रतिनिधींचा राजीनामा मागणारी बॅनर

■ बीड, प्रतिनिधी :

पीकविमा, सरसकट कर्जमाफी, घोषित शेतकरी अनुदान तसेच इतर प्रलंबित शेतीविषयक प्रश्नांवर लोकप्रतिनिधींनी सभागृहात प्रभावीपणे आवाज उठवावा, अशी मागणी करत अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी फलक लावून मागणी करण्यात आली .

संघटनेने लावलेल्या फलकांवर, "सरसकट कर्जमाफी, २०२५ चा पीकविमा, घोषित शेतकरी अनुदान व इतर शेती प्रश्नांवर सभागृहात प्रश्न मांडणार नसाल तर राजीनामा द्या," असा मजकूर प्रसिद्ध करण्यात आला आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील आमदार, खासदार लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील विविध शहरात प्रमुख चौक, बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणी हे फलक झळकविण्यात आले असून, या मोहिमेमुळे नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये चर्चेला उधाण आले आहे.










# स्वित्झर्लंडचा ऐतिहासिक विजय; अल्जेरियाचा पराभव करत गाठली विश्वचषकाची बाद फेरी



■ व्हँकुव्हर, ब्रिटिश कोलंबिया: वृत्तसंस्था

**ब्रील एम्बोलो आणि डॅन न्दोये यांच्या शानदार गोलच्या जोरावर स्वित्झर्लंडने गुरुवारी रात्री अल्जेरियाचा २-० ने पराभव करत विश्वचषकाच्या १६ संघांच्या (नॉकआऊट) फेरीत धडक मारली आहे. या विजयामुळे स्विस संघ आता पुढील मंगळवारी व्हँकुव्हरमध्ये होणाऱ्या नॉकआऊट सामन्यासाठी सज्ज झाला आहे.**

**सामन्याचा घटनाक्रम :** सामन्याच्या सुरुवातीला पहिल्या १० मिनिटांत अल्जेरियाचे वर्चस्व दिसून आले होते, मात्र त्यानंतर स्वित्झर्लंडने सामन्याची सूत्रे हाती घेतली. योहान मानझांबीच्या चपळ असिस्टवर ब्रील एम्बोलोने गोल करून संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. एम्बोलोचा हा २६ वा आंतरराष्ट्रीय गोल ठरला.

### दुसऱ्या हाफची सुरुवात होताच

अवघ्या काही सेकंदात डॅन न्दोयेने बॉक्सच्या बाहेरून एक जोरदार फटका मारला. अल्जेरियाचा गोलकीपर लुका झिदानने झेप घेऊन चेंडू अडवण्याचा प्रयत्न केला, मात्र चेंडू वेगाने जाळ्यात शिरला आणि स्वित्झर्लंडची आघाडी २-० झाली. ८१ व्या मिनिटाला फॅबियन रायडरने तिसरा गोल करण्याची संधी निर्माण केली होती, परंतु थोडक्यात ती हुकली. पोर्तुगालचा क्रोएशियावर २-१ ने जोरदार विजय; 'राऊंड ऑफ १६'मध्ये धडक फिफा विश्वचषक २०२६ च्या 'राऊंड ऑफ ३२' (Round of 32) सामन्यात पोर्तुगाल (Portugal)ने क्रोएशियाचा २-१ असा थरारक पराभव करत 'राऊंड ऑफ १६' मध्ये

**स्वित्झर्लंडसाठी ऐतिहासिक संधी :** स्वित्झर्लंडने १९३८ नंतर बाद फेरीतील एकही सामना जिंकलेला नाही, त्यामुळे यंदाच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या स्पर्धेत २० वर्षीय मानझांबी स्विस संघाचा उदयोन्मुख तारा म्हणून समोर आला आहे. दोन गोल आणि दोन असिस्टसह त्याने आपल्या खेळाचा प्रभाव पाडला आहे. संघाची पुढील लढत आता कोलंबिया किंवा घाना यांपैकी विजेत्या संघाशी होईल. लॉस एंजेलिस : फिफा विश्वचषक २०२६ (FIFA World Cup 2026) च्या राऊंड ऑफ ३२ (Round of 32) सामन्यात स्पेनने ऑस्ट्रियाचा ३-० असा एकतर्फी पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत (Round of 16) दमदार ...

**अल्जेरियाचे आव्हान संपुष्टात :** २०१४ नंतर प्रथमच विश्वचषकात पुनरागमन करणाऱ्या अल्जेरियासाठी ही स्पर्धा निराशाजनक ठरली. अल्जेरियाचे प्रशिक्षक व्लादिमीर पेटकोविच, ज्यांनी एकेकाळी स्विस संघाचे यशस्वी नेतृत्व केले होते, त्यांना आपल्या माजी संघाविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला. या महत्त्वाच्या सामन्याला फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांनी देखील उपस्थिती लावली होती. एका आठवड्याच्या सुट्टीनंतर सॅन दिएगो येथील प्रशिक्षण तळावरून परतलेल्या स्विस संघाने या विजयाने आपला आत्मविश्वास उंचावला आहे.

## आयर्लंडमधल्या जखमा अजून ताज्या, इंग्लंडमध्ये श्रेयसचा 'तो' निर्णय अनपेक्षित, माजी क्रिकेटर काय म्हणाला?

■ मुंबई : वृत्तसंस्था

इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात श्रेयस अय्यरच्या एका निर्णयाने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. ढगाळ वातावरण आणि पावसाची शक्यता असतानाही त्याने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. साधारणपणे अशा परिस्थितीत संघ आधी गोलंदाजीच निवडतात. मग श्रेयसने हा निर्णय का घेतला? यावर माजी क्रिकेटपटू दिनेश कार्तिकने मोठं विधान केलं आहे. चेस्टर-ले-स्ट्रीट येथे भारताने प्रथम फलंदाजी करत ७ बाद १८९ धावा केल्या. मात्र, त्यानंतर पावसामुळे इंग्लंडचा डाव सुरूच होऊ शकला नाही आणि सामना अनिर्णित राहिला. पण श्रेयसच्या निर्णयाची चर्चा कायम राहिली.

### आयर्लंडविरुद्धच्या पराभवाचा परिणाम ?

■ कार्तिकच्या मते, या निर्णयामागे आयर्लंड दौऱ्यातील पराभवाचा परिणाम असू शकतो. त्या मालिकेत भारताला दोनही सामने गमवावे लागले होते. त्यामुळे पुन्हा धावांचा पाठलाग करताना दबाव येऊ नये, म्हणून भारताने आधी फलंदाजी करण्याचा पर्याय निवडला असावा. क्रिकबझवर बोलताना कार्तिक म्हणाला, "अशा हवामानात बहुतांश संघ आधी गोलंदाजी करतात. पण भारताने वेगळा निर्णय घेतला. मला वाटतं, आयर्लंड दौऱ्याचा परिणाम अजूनही संघाच्या मनात होता. त्यामुळे प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला गेला."

### श्रेयसवर होता दबाव

■ आयर्लंड दौरा श्रेयससाठी अत्यंत खराब ठरला होता. दोन सामन्यांत त्याच्या बॅटमधून अवघ्या १३ धावा आल्या होत्या. त्यामुळे इंग्लंडविरुद्धची खेळी त्याच्यासाठी खूप महत्त्वाची होती. याबाबत कार्तिक म्हणाला, "कर्णधार म्हणून श्रेयसवर दबाव होता. अशावेळी स्वतः धावा करून संघाला पुढे नेणं गरजेचं असतं. त्याने तेच केलं. 'मी कर्णधार आहे आणि मी संघासाठी धावा करेन,' हा संदेश त्याने आपल्या खेळातून दिला.



### सुरुवातीला धक्के, मग श्रेयस-अभिषेकची भागीदारी

■ भारताची सुरुवात खराब झाली. संजू सॅमसन एका धावेवर, तर ईशान किशन शून्यावर बाद झाला. मात्र, त्यानंतर अभिषेक शर्मा आणि श्रेयस अय्यर यांनी डाव सावरला. अभिषेकने २४ चेंडूत ५९ धावांची आक्रमक खेळी केली. श्रेयसनेही जबाबदारीने फलंदाजी करत ४७ चेंडूत ६८ धावा केल्या. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ८२ धावांची महत्त्वाची भागीदारी केली.

## भारतीय संघ इंग्लंडनंतर श्रीलंका दौऱ्यावर, BCCIकडून कसोटी मालिका जाहीर

■ मुंबई : वृत्तसंस्था

भारतीय संघ आता इंग्लंड दौऱ्यावर असून टी-२० आणि वन डे मालिका होणार आहे. ५ टी-२० सामने आणि ३ वनडे सामने झाल्यावर भारताचा श्रीलंका दौरा असणार असून त्यासाठीचे बीसीसीआयने पुढील श्रीलंका दौऱ्याचे वेळापत्रक जाहीर केले आहे. श्रीलंका दौऱ्यामध्ये भारतीय संघाचे दोन कसोटी सामने असणार आहेत. दोन कसोटी सामने नेमके केव्हा असणार जाणून घ्या.




### ■ श्रीलंका दौऱ्याची घोषणा

इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या भारतीय संघाचा अखेरचा सामना १९ जुलैला असणार आहे. त्यानंतर भारताचा श्रीलंका दौरा असणार आहे. बीसीसीआयने जाहीर केलेल्या दोनमधील पहिला कसोटी सामना १५ ऑगस्ट ते १९ ऑगस्टमध्ये असणार आहे. त्यानंतर पुढचा सामना २३ ऑगस्टला होणार असून हे दोन्ही सामने भारतीय वेळेनुसार सकाळी दहा वाजता सुरू होणार आहेत. वेळेबाबत अद्याप अधिकृत अशी माहिती दिली नाही.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपमध्ये भारताला आपले आव्हान ठेवण्यासाठी श्रीलंकेमध्ये होणारी दोन सामन्यांची मालिका महत्त्वाची असणार आहे. आता मागे घरच्या मैदानावर भारताला दक्षिण आफ्रिका संघाने पराभूत केले होते. भारताने या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपमध्ये ९ सामन्यांमध्ये ४ सामने जिंकले होते. कसोटी पॉइंट टेबलमध्ये ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड हे संघ टॉप तीनमध्ये आहेत. त्यामुळे कमबॅक करण्यासाठी भारताला ही मालिका जिंकावी लागणार आहे. आता भारतीय संघाने अफगाणिस्तानसोबत एक कसोटी सामना खेळला होता. त्यामध्ये भारताने सहज विजय साकारला होता पण त्या विजयाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपमध्य ग्राह्य धरता येणार नव्हते. या एकमेक कसोटीमध्ये अफगाणिस्तानविरूद्ध अनेक युवा खेळाडूंनी पदार्पण केले होते. यामधील मानव सुथार हा सात विकेट घेत सामनावीर ठरला होता.

भारत वि. श्रीलंका कसोटी सामने वेळापत्रक पहिला कसोटी सामना- १५ ऑगस्ट २०२६ ते १९ ऑगस्ट २०२६ (गॉल) दुसरा कसोटी सामना- २३ ऑगस्ट- २०२६ ते २७ ऑगस्ट २०२६ (कोलंबो)

### ■ भारत-श्रीलंका हेड टू हेड (श्रीलंका)

दरम्यान, श्रीलंकेमध्ये भारताचा रेकॉर्ड इतकाही खास नाहीये. कारण २७ सामन्यांमध्ये भारताला ९ मध्येच विजय मिळवता आले आहे. पण ७ सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला असून ११ सामने अनिर्णित राहिले. त्यामुळे शुभमन गिलच्या नेतृत्त्वात भारतीय संघासमोर श्रीलंकेमधील दोन कसोटी सामने आव्हानाप्रमाणेच असणार आहेत.

## अंबाजोगाई पोलिसांचा `२४ तासांत` मोठा पराक्रम! एसबीआय एटीएम फोडणारी टोळी जेरबंद; ३ आरोपी अटकेत, महिंद्रा मॅक्स वाहन जप्त

■ अंबाजोगाई अशोक दळवे

अंबाजोगाई शहरातील बस डेपो परिसरातील अण्णाभाऊ साठे चौकाजवळ असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय)च्या एटीएममध्ये फोडाफोड करून रोकड चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीचा अंबाजोगाई शहर पोलिसांनी अवघ्या २४ तासांत पर्दाफाश केला. या प्रकरणात तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, गुन्ह्यात वापरण्यात आलेले महिंद्रा मॅक्स वाहन जप्त करण्यात आले आहे. या जलद कारवाईबद्दल अंबाजोगाई शहर पोलिसांचे कौतुक होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक ३ जुलै २०२६ रोजी पहाटे सुमारे २.१३ वाजण्याच्या सुमारास अज्ञात आरोपींनी बस डेपोजवळील एसबीआय एटीएमचे लॉक व बाहेरील भाग फोडून मशीनमधील रोकड चोरण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याचवेळी परिसरात गस्त घालणाऱ्या पोलिस वाहनाचा सायरन ऐकू आल्याने आरोपींनी चोरीचा प्रयत्न अर्धवट सोडून घटनास्थळावरून पलायन केले.

या घटनेप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २७५/२०२६ दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२), ६२, ३२४ व ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

घटनेनंतर पोलिसांनी शहरातील विविध ठिकाणांवरील सीसीटीव्ही फुटेजचे बारकाईने परीक्षण केले. तपासादरम्यान संशयित वाहन परळीच्या दिशेने गेल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर परळी शहरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून वाहनावरील सांकेतिक चिन्हांच्या आधारे वाहन व संशयितांची ओळख पटविण्यात आली.

यानंतर अंबाजोगाई पोलिसांनी परळी शहर पोलीस ठाणे व परभणी येथील स्थानिक गुन्हे शाखेशी (एलसीबी) समन्वय साधला. एलसीबी परभणीच्या मदतीने आरोपींना ताब्यात घेण्यात आले व त्यानंतर त्यांना अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात आणून अटक करण्यात आली.

### अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत

■ परमेश्वर सोनाभाऊ बनगर (रा. झरी, ता. मानवत, जि. परभणी), राजेश भाऊसाहेब कांबळे (रा. कोल्हा, ता. मानवत, जि. परभणी), विवेक बबन धारे (रा. कोल्हा, ता. मानवत, जि. परभणी), या गुन्ह्यात वापरण्यात आलेले महिंद्रा मॅक्स वाहन पोलिसांनी जप्त केले असून, या प्रकरणातील इतर आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रकाश गायकवाड करीत आहेत. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोलीस हवालदार पांडुरंग काळे, प्रकाश गायकवाड, अनिल डोंगरे, संदीप मुंडे, बदाम आरसूळ, हनुमंत चादर, हनुमंत लाड तसेच पोलीस अंमलदार बाबासाहेब घुगे यांच्या पथकाने पार पाडली.



दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापून मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# राज्याच्या 'शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने' उटीच्या प्रयोगशील शेतकरी विनोद मैंद यांचा गौरव

**महागाव |** महागाव तालुक्यातील उटी येथील प्रयोगशील शेतकरी विनोद मैंद यांच्या कृषी क्षेत्रातील संशोधन, नावीन्यपूर्ण प्रयोग आणि शेतकरीहिताच्या कार्याची राज्य शासनाने दखल घेत त्यांना प्रतिष्ठेचा 'शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार – २०२३' प्रदान करून गौरविण्यात आले. नुकत्याच चार दिवसांपूर्वी

मुंबईच्या वरळी येथील लोटस डोम येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल,फलोत्पादन मंत्री भारत गोगावले,मंत्री इंद्रनील नाईक, कृषी आयुक्त सुरज मांढरे, कृषी सचिव परिमल सिंह तसेच विस्तार संचालक रफिक नाईकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

विनोद मैंद यांनी निवड पद्धतीद्वारे सोयाबीनच्या दोन, हरभऱ्याच्या चार आणि तुरीच्या एका सुधारित वाणाची निर्मिती करून कृषी संशोधन क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांनी विकसित केलेल्या तुरीच्या वाणाला 'शिवनेरी-४५' असे नाव दिले असून, हे वाण अधिक उत्पादनक्षम असल्याचा त्यांचा दावा आहे. या वाणाच्या बियाण्यांना राज्यभरातील शेतकऱ्यांकडून वाढता प्रतिसाद मिळत आहे.

वाण निर्मितीबरोबरच आधुनिक पीक लागवड पद्धती,उत्पादनवाढ आणि कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार यासाठीही त्यांनी सातत्याने प्रयोग केले आहेत. त्यांच्या संशोधनप्रधान कार्यामुळे अनेक शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचा नवा मार्ग मिळाला असून,कृषी क्षेत्रात त्यांनी स्वतंत्र आणि प्रेरणादायी स्थान निर्माण केले आहे.

राज्य शासनाकडून प्राप्त झालेला 'शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार' हा त्यांच्या अनेक वर्षांच्या अथक परिश्रम, संशोधनवृत्ती आणि शेती विकासासाठीच्या समर्पित कार्याचा गौरव मानला जात असून,महागाव तालुक्यासह यवतमाळ जिल्ह्यासाठीही ही अभिमानाची बाब ठरत आहे.



## आष्टी तहसील कार्यालयात संजय गांधी, श्रावणबाळ व दिव्यांग योजनेच्या लाभार्थ्यांसाठी विशेष आधार अपडेट कॅम्प सुरू

### तातडीने आधार अद्ययावत करण्याचे तहसील प्रशासनाचे आवाहन

**आष्टी | प्रतिनिधी**

शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. आष्टी तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, तसेच अपंग, दिव्यांग व वृद्धापकाळ योजनांतील लाभार्थ्यांसाठी आष्टी तहसील कार्यालयात विशेष आधार अपडेट कॅम्प सुरू करण्यात आला आहे. अनेकदा बोटांचे ठसे उमटत नसल्याने किंवा इतर विविध तांत्रिक कारणांमुळे लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण होऊ शकत नाही, परिणामी शासनाकडून मिळणारे मासिक मानधन मिळण्यात अडचणी निर्माण होतात. हीच बाब विचारात घेऊन लाभार्थ्यांचे हक्काचे मानधन अडकू नये, या उदात्त उद्देशाने तहसील प्रशासनाच्या वतीने हा विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे. १ जुलैपासून या विशेष कॅम्पला सुरुवात झाली असून आष्टी तालुक्यातील अंध, अपंग, दिव्यांग, वयोवृद्ध तसेच अद्याप आधार अपडेट न झालेल्या सर्व पात्र लाभार्थ्यांनी या सुविधेचा तातडीने लाभ घ्यावा, असे आवाहन आष्टी तहसील प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

सध्याच्या घडीला शासनाच्या डीबीटी (थेट लाभ हस्तांतरण) प्रणालीद्वारे सर्व योजनांचे मानधन थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते. त्यामुळे प्रत्येक लाभार्थ्याचे आधार कार्ड पूर्णपणे अद्ययावत असणे आणि ते बँक खात्याशी लिंक असणे अत्यंत बंधनकारक झाले आहे. जर वेळेत आधार अपडेट झाले नाही, तर भविष्यात शासनाच्या या कल्याणकारी योजनांचे मानधन मिळण्यात मोठ्या अडचणी निर्माण होऊ शकतात. विशेषतः वृद्ध, निराधार आणि दिव्यांग नागरिकांना बोटांचे ठसे स्पष्ट उमटत नसल्यामुळे आधार प्रमाणीकरणात वारंवार अडथळे येत होते, हीच अडचण दूर करण्यासाठी आता थेट तहसील कार्यालयातच ही विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मोहिमेच्या माध्यमातून सर्व लाभार्थ्यांची आधार माहिती अचूकपणे अद्ययावत केली जाणार असून, त्यांना योजनांचा लाभ कोणत्याही खंडशिवाय सातत्याने मिळत राहावा हाच यामागील मुख्य हेतू आहे.

या विशेष मोहिमेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी आपल्यासोबत आधार कार्ड, बँक पासबुक, चालू मोबाईल क्रमांक, संबंधित योजनेचा लाभार्थी असल्याचा पुरावा आणि मतदार कार्ड किंवा राशन कार्ड यांसारखे ओळखीचे पुरावे व आवश्यक कागदपत्रे घेऊन आष्टी तहसील कार्यालयातील विशेष कॅम्पला भेट देणे गरजेचे आहे. सर्व पात्र लाभार्थ्यांनी वेळेत आपले आधार कार्ड अद्ययावत करून घ्यावे, जेणेकरून शासनाच्या सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरक्षित आणि सुरू राहील, असे आवाहन तहसील प्रशासनाच्या वतीने अधिकृतपणे करण्यात आले आहे.

## 'विकसित भारत जी-रामजी' योजना कामाचा श्रीगणेशा

**उटवद |** ग्रामीण भागाचा कायापालट करणाऱ्या आणि रोजगारासोबतच शाश्वत विकासाची हमी देणाऱ्या विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशनचा जिल्हास्तरीय शुभारंभ जालना तालुक्यातील उटवद येथे झाला. १ जुलै २०२६ पासून विकसित भारत जी-रामजी कायदा-२०२५ देशभरात लागू झाला आहे. या नव्या कायद्यांतर्गत आयोजित जनसंवाद संमेलनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारीया यांच्या हस्ते झाले.

यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या, ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी जलसुरक्षा, पायाभूत सुविधा, आजीविका, हवामान बदल या चार प्रमुख मुद्द्यांवर ही योजना काम करेल. एल निनोच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात जालना जलकवच अभियान-२०२६ अंतर्गत जलसंधारणाची कामे गतीने राबवण्याचे आवाहन त्यांनी केले. मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारीया यांनी कामांची गुणवत्ता, पारदर्शकता, तंत्रज्ञानाचा वापर यावर भर देणार असल्याचे सांगितले. सुरुवातीला उपजिल्हाधिकारी (रोहयो) मनीषा दांडगे यांनी मनरेगा आणि नव्या कायद्यातील महत्त्वाचे बदल मांडले. यावेळी उपस्थितांनी हक्क संरक्षण प्रतिज्ञा घेतली. तसेच वृक्षलागवड व जलतारा कामांचा शुभारंभही झाला. या कार्यक्रमाला वन अधिकारी वडोदे, रेशीम विकास अधिकारी अजय मोहिते यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, महिला बचत गट, आशा वर्कर्स, मजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामविकास अधिकारी प्रवीण पवार व सोपान मोहिते यांनी संयोजन केले. दरम्यान, भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्यासाठी ही नवी योजना सुरू झाली आहे. यात कुटुंबातील प्रौढ सदस्यांना १०० ऐवजी १२५ दिवस रोजगार मिळणार आहे. अकुशल कामांसोबतच जलसंधारण, रस्ते, सौर ऊर्जा, पायाभूत सुविधांच्या विकासावर मुख्य भर दिला जाईल.

कामांवर "डिजिटल नजर" पारदर्शकता व कामाचा दर्जा राखण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. यात जीओ टॅगिंग, बायोमेट्रिक उपस्थिती, एआय डॅशबोर्ड, युक्तीधारासारख्या डिजिटल प्रणालींद्वारे निरीक्षण केले जाणार आहे. जिल्हाधिकारी समन्वयक असतील.या योजनेत केवळ अकुशल श्रमावर भर नाही. अकुशल श्रम, उपजीविका -आधारित सुविधा, ग्रामीण पायाभूत सुविधा असा व्यापक दृष्टिकोन आहे. जलसंधारण, ग्रामीण रस्ते, पूल, अंगणवाडी, शाळा सुविधा, सौर ऊर्जा, गोदामे सुविधा आदी कामांचा समावेश करण्यात आला.

## लग्नास 20 मिनिटे बाकी अन् पोलिसांची मंडपात एंट्री

**छत्रपती संभाजीनगर |** दारूच्या नशेत बुडालेला पिता, घरची अत्यंत हलाखीची परिस्थिती आणि हातावरचे पोट या विवंचनेला कंटाळून आईनेच आपल्या अल्पवयीन मुलीचे लग्न आत्याचा मुलगा असलेल्या २४ वर्षांच्या तरुणाशी लावून देण्याचा घाट घातला. साखरपुड्याच्या निमित्ताने २५० वऱ्हाडी गोळा झाले अन् खर्चाची बचत म्हणून साखरपुड्यातच लग्न उरकण्याचा डाव रचला गेला. लग्नाच्या अक्षता पडायला अवघी २० मिनिटे बाकी असतानाच, एका सजग नागरिकाने केलेल्या फोनमुळे पोलिसांचे पथक मंडपात धडकले आणि एका मुलीचा बालविवाह रोखला. दिघी गावात रविवारी (५ जुलै) ही घटना घडली.

दिघी गावातील अल्पवयीन मुलीने दहावीच्या परीक्षेत ६५ टक्के गुण मिळवले आहेत. तिला पुढे शिकण्याची इच्छा आहे, मात्र तिचे वडील मद्यपी असून, घरात हलाखीची परिस्थिती आहे. यामुळे मुलीच्या आईने नणंदेच्या मुलासोबत तिचे लग्न जुळवले. गरिबीमुळे स्वतंत्र लग्नाचा खर्च परवडणारा नसल्याने रविवारी आयोजित साखरपुड्याच्या कार्यक्रमातच २५० नागरिकांच्या उपस्थितीत लग्न उरकण्याचे नियोजन केले होते.

### आईला अश्रू अनावर

ऐन लग्नाच्या वेळी पोलिस मंडपात शिरल्याने वऱ्हाडी आणि गावकऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली. पोलिसांनी तातडीने लग्नविधी थांबवून मुलीच्या आईकडे चौकशी केली असता, 'नवरा प्रचंड दारू पितो, आम्ही हातावर पोट असलेले शेतकरी



आहोत. मुलीचा सांभाळ कसा करायचा या विवंचनेतून जवळच्या नात्यात लग्न ठरवले,' असे सांगत आईला रडू कोसळले.

... अन् यंत्रणा हलली बालविवाह होत असल्याची कुणकुण एका सजग नागरिकाला लागली. लग्न लागण्यास अवघी २० मिनिटे बाकी असताना त्यांनी तातडीने चाइल्ड लाइन आणि पोलिसांच्या 'डायल ११२' वर संपर्क साधून माहिती दिली. घटनेचे गांभीर्य ओळखत कंट्रोल रूमला माहिती देऊन वाळूज पोलिस ठाण्याचे पीएसआय गोरे, 'डायल ११२'चे अंमलदार राजपूत, त्रिभुवन, हेड कॉन्स्टेबल निर्मला निंभोरे आणि दिघी गावचे ग्रामविकास अधिकारी काळवणे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

## धबधब्यावर गेलेल्या तरुणाचा संशयास्पद मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर |** दौलताबाद येथील नंदीबेड धबधबा परिसरात मृतदेह आढळला. पोलिसांच्या पथकाने स्ट्रेचरवरून मृतदेह आणला.

"मित्रांसोबत धबधब्यावर जाऊ नकोस,' असा वडिलांनी काळजीपोटी दिलेला हा सल्ला न ऐकणे शहरातील रमानगर येथील एका १८ वर्षांच्या तरुणाच्या जिवावर बेतले. रविवारी (५ जुलै) सुटीच्या दिवशी मित्रांसोबत दौलताबाद परिसरातील केसापुरी तांडा येथील नंदीबेड धबधबा पाहण्यासाठी गेलेल्या प्रथमेश कांतीलाल गायकवाड (१८, रा. रमानगर) याचा मृत्यू झाला. या प्रकाराने घाबरलेले मित्र घटनास्थळावरून पळून गेले. या दुर्घटनेची माहिती नातेवाइकांना मित्रांच्या सोशल मीडिया 'स्टेटस'वरून मिळाली.

प्रथमेश हा बारावीत शिकत होता. त्याचे वडील कांतीलाल गायकवाड एका कुरिअर कंपनीची रिक्षा चालवतात. रविवारी सुटी असल्याने प्रथमेशने मित्रांसोबत पैसे जमवून धबधबा पाहण्यासाठी जाण्याचा बेत आखला आणि वडिलांकडे पैशांची मागणी केली होती. वडिलांनी त्याला, "तू मित्रांसोबत जाऊ नकोस,' असे सांगितले होते. मात्र, वडिलांचा हा सल्ला डावलून प्रथमेश मित्रांसोबत नंदीबेड धबधब्यावर गेला. दरम्यान, प्रथमेश याचा मृत्यू नेमका कसा झाला याचा उलगडा त्याच्या मित्रांचे जबाब नोंदवल्यावर होईल, अशी माहिती दौलताबाद पोलिसांनी दिली.

### पोलिसांची २ किलोमीटर डोंगरातून पायपीट

सायंकाळी सहाच्या सुमारास माहिती मिळताच दौलताबाद पोलिसांचे पथक घटनास्थळी गेले. नंदीबेड धबधबा परिसर दुर्गम असल्याने तेथे वाहने जाणे शक्य नव्हते. उपनिरीक्षक अशोक सोनवणे, अंमलदार कपिल सातदिवे, रावसाहेब ढिल्लारे यांच्या पथकाने २ किलोमीटर पायपीट केली. त्यानंतर खांद्यावरून मृतदेह खाली आणला. या प्रकरणी दौलताबाद ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### 'स्टेटस'वरून समजले वृत्त

धबधबा परिसरात पोहोचल्यानंतर पाण्याचा आणि खोलीचा अंदाज न आल्याने प्रथमेशचा मृत्यू झाला. आपल्या डोळ्यांदेखत मित्र गेल्याने त्याचे मित्र प्रचंड घाबरले. त्यांनी प्रथमेशच्या कुटुंबाला माहिती देण्याऐवजी किंवा मदतीसाठी थांबण्याऐवजी तेथून पळ काढला. घरी परतल्यानंतर या मित्रांनी सोशल मीडियावर प्रथमेशच्या मृत्यूचे स्टेटस ठेवले. हे स्टेटस पाहून प्रथमेशच्या नातेवाइकांना धक्का बसला.



## नंदुरबार जिल्ह्यातील अती दुर्गम क्षेत्राच्या आदिवासी भागातील पायाभूत सुविधांची दयनीय अवस्था!

देश स्वतंत्र होऊन ७९ वर्षे झालेत तरीही देशातील अनेक राज्यात किंवा जिल्ह्यात पायाभूत व मुलभूत सुविधांचा मोठा प्रमाणात अभाव दिसून येतो.याचे जिवंत उदाहरण म्हणजे महाराष्ट्रातील नंदूरबार जिल्ह्यातील समस्या. राज्याचा विकास जेवढ्या झपाट्याने सुरू असल्याचे सांगितले जाते. त्यापेक्षा जास्त खस्ता परिस्थिती राज्यातील अती दुर्गम भागातील पायाभूत व मुलभूत सुविधांच्या अभावामुळे दिसून येते.अशीच घटना नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील टाकळी गावाजवळ निझरी नदीवरील पूल अद्याप अपूर्ण असल्याने एका गर्भवती महिलेला प्रसूतीसाठी बांबूच्या झोळीतून नदीपात्र ओलांडत जीवघेणा प्रवास करावा लागला.मात्र सुदैवाने महिलेला कोणत्याही प्रकारची इजा झाली नाही. आरोग्य आणि दळणवळण यंत्रणेच्या अभावामुळे आजही अती दुर्गम भागातील रूग्णांना बांबूच्या झोळीत न्यावे लागत असल्याची स्थिती कायम आहे ही राज्यासाठी शोकांतिका म्हणावी लागेल. टाकळी नजीकच्या निझरा नदीवरील पुलाचे काम रखडल्याने एका गर्भवती महिलेला झोळीतून रूग्णालयात न्यावे लागले.वेळेत ही सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्याने महिलेने कन्येला जन्म दिला माय-लेक सुखरूप असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.ही गोष्ट ठीक आहे की, गावकऱ्यांनी वेळीच काळजी घेतली अन्यथा, थोडासाही विलंब झाला असता तर अनर्थ झाला असता.परंतु गावकऱ्यांनी थोडासाही विलंब न करता तातडीने बांबूच्या झोळीच्या माध्यमातून दुर अंतरापर्यंत असलेल्या रूग्णालयात न्यावे लागले व महिलेचा व नवजात शिशूचा जीव वाचविला.परंतु थोडासाही वेळ झाला असता तर महिलेच्या जीवाला धोका निर्माण झाला असता.अशीच गंभीर परिस्थिती राज्यासह देशाच्या अनेक अती दुर्गम भागात पहायला मिळते.यावरून स्पष्ट होते राज्याचा विकास हा फक्त शहरापर्यंतच सिमीत असल्याचे दिसून येते.कारण आजही राज्यातील अती दुर्गम भागातील हालत अत्यंत खस्ता ,गंभीर व चिंताजनक आहे ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.काही गोष्टी सरकारच्या लक्षात असून सुद्धा लक्ष देत ही शोकांतिका म्हणावी लागेल.अती दुर्गम भागातील आमदार-खासदार (लोकप्रतिनिधी) यांना त्या जिल्ह्यातील गंभीर समस्या कशा काय दिसत नाही? याचे आश्चर्यच वाटते!कारण अती दुर्गम भागातील लोकांच्या समस्या डोळ्यासमोर असुन सुद्धा डोळेझाकपणा करतात ही बाब तेथील लोकप्रतिनिधींची शोकांतिका म्हणावी लागेल.गेल्या अनेक वर्षांपासून सरकारचे नंदुरबार जिल्ह्याकडे दुर्लक्ष असल्याचे दिसून येते.कारण या अगोदरही अशाप्रकारच्या अनेक भयावह गंभीर घटना घडल्या आहेत.सध्याच्या घटनेमुळे नंदुरबार जिल्ह्यातील दुर्गम आणि आदिवासी भागातील पायाभूत आणि मुलभूत सुविधांची दयनीय अवस्था पुन्हा समोर आली आहे.कारण पूल आणि रस्त्यांची कामे रखडल्याने नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याची वस्तुस्थिती या घटनेतून अधोरेखित झाली आहे.नंदुरबारच्या तळोदा तालुक्यातील टाकळी गावातील ग्रामस्थ आणि नातेवाईकांनी महिलेला बांबूच्या झोळीतून नदीपात्र ओलांडत दुसऱ्या बाजूला आणले.त्यानंतरही रस्ता अत्यंत खराब आणि ओबडधोबड असल्याने खाजगी वाहनाच्या सहाय्याने महिलेला रूग्णवाहिका उभी असलेल्या ठिकाणी पोहचविण्यात आले व तेथून महिलेला तातडीने तळोदा रूग्णालयात दाखल करण्यात आले आणि महिलेची सुखरूप प्रसूती झाली असून तिने एका कन्येला जन्म दिला.अशाप्रकारे राज्यातील आरोग्य सुविधा रखडलेली दिसून येते.त्यामुळे वरील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता सरकारने अती दुर्गम भागात तातडीने आरोग्य सुविधा प्रदान करावी. जेणेकरून ग्रामस्थांना आरोग्य सुविधा ताबडतोब उपलब्ध होईल.सध्याच्या परिस्थितीत पावसाळा सुरू आहे अशा परिस्थितीत सुरूवातीच्या पावसातच महाराष्ट्रातील मुंबई,अती दुर्गम भाग व विदर्भासह अनेक भाग जलमग्न झाल्याचे दिसून येते ही अत्यंत गंभीर व चिंताजनक परिस्थिती आहे यावर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे राज्यातील ज्या-ज्या भागात पायाभूत सुविधा व मुलभूत सुविधांचा अभाव आहे अशा सर्वच ठिकाणी सरकारने, लोकप्रतिनिधींनी लक्ष घालून सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.जय हिंद!



**लेखकः रमेश कृष्णराव लांजेवार ( स्वतंत्र पत्रकार )**

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, सोमवार 6 जुलै 2026

Last page

# ना. पंकजाताई मुंडे यांनी नवी दिल्लीत घेतली केंद्रीय आरोग्यमंत्री जे पी नड्डा यांची भेट

**नवी दिल्ली |** राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज नवी दिल्ली येथे केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा यांची भेट घेतली. देशातील वाढत्या पर्यावरणीय समस्यांच्या पार्श्वभूमीवर आरोग्य क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी "राष्ट्रीय स्वच्छ आरोग्य पायाभूत सुविधा अभियान (NCHIM)" राबविण्याचा प्रस्ताव मांडून त्यांनी याचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्याबाबत प्रदीर्घ चर्चा केली. या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करू असं केंद्रीय मंत्री नड्डा यांनी यावेळी आश्वस्त केलं. सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण यांच्यातील वाढत्या प्रदूषणावरील परिणामांचा विचार करून हा महत्त्वपूर्ण उपक्रम ना. पंकजाताई मुंडे यांनी सुचविला असून तसे पत्र आज नड्डा यांना दिले. सरकारी रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालये ही आरोग्य सेवा पुरवित असताना मोठ्या प्रमाणावर सांडपाणी, जैववैद्यकीय कचरा, वायू प्रदूषण आणि रासायनिक दूषित पदार्थ निर्माण होतात. अपुऱ्या प्रक्रियेमुळे या सांडपाण्यातील जंतू, अँटिबायोटिक अवशेष आणि घातक रसायने पर्यावरणासाठी तसेच मानवी आरोग्यासाठी धोकादायक ठरत आहेत. विशेषतः अँटिमायक्रोबियल रेसिस्टन्स (AMR) सारख्या गंभीर समस्यांना यामुळे चालना मिळत असल्याचे तज्ज्ञांचे मत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**आरोग्य क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रणासाठी 'राष्ट्रीय स्वच्छ आरोग्य पायाभूत सुविधा अभियान' राबविण्याचा मांडला प्रस्ताव**



**सरकारी रुग्णालये व महाविद्यालयातील जैववैद्यकीय कचऱ्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाकडे वेधले लक्ष**

## वैद्यकीय संस्थांमध्ये एसटीपी प्रकल्प उभारले जावेत

प्रस्तावित राष्ट्रीय स्वच्छ आरोग्य पायाभूत सुविधा अभियान (NCHIM-National Clean Healthcare Infrastructure Mission)

अंतर्गत सर्व सरकारी रुग्णालये आणि वैद्यकीय संस्थांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) उभारणीसाठी विशेष निधी देण्याची तरतूद करण्याचा प्रस्ताव दिला आहे.शासकीय रुग्णालयांमध्ये डिझेल जनरेटरचा वापर कमी करून स्वच्छ ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने आणि हरित पायाभूत सुविधा (सौर ऊर्जा, पावसाचे पाणी साठवण, ऊर्जा कार्यक्षम प्रणाली) यांचा अवलंब करण्यावरही भर देण्यात येणार आहे.या मिशनअंतर्गत 'आरोग्य-पर्यावरण सर्वेक्षण प्रणाली' विकसित करून रोगांचे आकडे आणि प्रदूषण निर्देशांक यांचे एकत्रित विश्लेषण करण्यात येणार आहे. यामुळे धोरणनिर्मिती अधिक प्रभावी आणि वैज्ञानिक होण्यास मदत होईल असं त्या म्हणाल्या.

या मोहिमेमुळे पर्यावरण संरक्षण, सार्वजनिक आरोग्य सुधारणा आणि शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यास मोठी मदत होईल असंही पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे.

# परळीत १४ जुलैला रंगणार भव्य 'रिंगण सोहळा'; माजी मंत्री धनंजय मुंडे व मंत्री पंकजा मुंडेंची प्रमुख उपस्थिती

**अ.भा.वारकरी भजनी मंडळ व परळी नगरपरिषदेचे आयोजन, भक्तिमय वातावरणात रंगणार सोहळ्याचे 'सहावे पुष्प'**





**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

श्री संत नामदेव महाराज नर्शीनामदेव (ता. हिंगोली) येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणारी पायदंडी दरवर्षीप्रमाणे परळी शहरातून जाते. या पालखीचे स्वागत आणि परळीकरांना पंढरीच्या वारीतील रिंगण सोहळ्याचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा, यासाठी अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळ व परळी नगरपरिषदेच्या वतीने १४ जुलै रोजी दुपारी ठीक ३:०० वाजता शहरात भव्य रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचे हे सलग सहावे वर्ष (पुष्प) असल्याची माहिती अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांनी दिली आहे.

या दिमाखदार रिंगण सोहळ्याला माजी मंत्री धनंजयजी मुंडे, राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे, नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान (नाना) मुंडे यांच्यासह परळी शहरातील सर्व नगरसेवक, प्रतिष्ठित व्यापारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे वारकरी महिला भाविक एकाच रंगाच्या (केसरी) साड्या परिधान करून यात सहभागी होणार आहेत. यामुळे संपूर्ण परळी शहर विठू नामाच्या गजरात आणि भगव्या रंगात न्हाऊन निघणार आहे. या सोहळ्यात पंचक्रोशीतील भजनी मंडळे, पत्रकार, विविध वाहिन्यांचे माध्यम प्रतिनिधी, डॉक्टर्स, शिक्षक, वकील आणि परळीतील सर्व छायाचित्रकार (फोटोग्राफर्स) मोठ्या संख्येने उपस्थित राहून वारीचा आनंद घेणार आहेत.

■ **घरी न थांबता सहपरिवार सहभागी होण्याचे आवाहन**

पंढरपूरच्या वारीतील रिंगण सोहळ्याची हुबेहूब अनुभूती परळीतच मिळणार असल्याने, परळी शहर आणि परिसरातील तमाम भाविक भक्तांनी १४ जुलै रोजी दुपारी ३ वाजता कोणत्याही परिस्थितीत घरी न थांबता, आपल्या संपूर्ण परिवारासह या भव्य सोहळ्यात सहभागी व्हावे, असे कळकळीचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# राज्य गुणवत्ता यादीत ८ वा क्रमांक; कु. प्रांजल पोकळे शिष्यवृत्ती धारक

**आष्टी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ (इयत्ता ५ वी) मध्ये वसुंधरा प्राथमिक विद्यालय, आष्टी येथील विद्यार्थिनी कु. प्रांजल जालिंदर पोकळे हिने ३०० पैकी २८० गुण (९३.३३३३ टक्के) प्राप्त करून राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत ८ वा क्रमांक मिळवला आहे. या उल्लेखनीय यशामुळे ती शिष्यवृत्ती धारक ठरली आहे.

कु. प्रांजलच्या या यशामागे तिची खडतर मेहनत, जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यास याबरोबरच वर्गशिक्षिका श्रीमती कर्डिले मॅडम यांचे परिश्रम तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री मनोरंजन धस यांचे वेळोवेळी लाभलेले मोलाचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.



तिच्या या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री मनोरंजन धस, वर्गशिक्षिका श्रीमती कर्डिले मॅडम, वसुंधरा प्राथमिक विद्यालय, आष्टी येथील सर्व शिक्षक, नातेवाईक व हितचिंतकांनी तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. तसेच तिचे मामा श्री विठ्ठल आजबे व नातेवाईकांनी तिचा विशेष सत्कार करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कु. प्रांजलचे वडील जालिंदर ब. पोकळे हे न्यायालयात कार्यरत असून, आई शिक्षिका आहेत. आपल्या मुलीच्या या यशाबद्दल त्यांनी संस्थेचे अध्यक्ष श्री मनोरंजन धस, वर्गशिक्षिका श्रीमती कर्डिले मॅडम, तसेच वसुंधरा प्राथमिक विद्यालय, आष्टी येथील सर्व शिक्षकांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. तसेच भविष्यातही प्रांजलने अशीच यशस्वी वाटचाल करून गाव व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानचे शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान : शिवहार लहाने

**पुरंदर तालुक्यातील शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान**

**पुणे (प्रतिनिधी)**

म. ए. सो. वाघीरे माध्यमिक व उच्च विद्यालय, सासवड येथील विद्यार्थ्यांसह पुरंदर तालुक्यातील विविध शाळांमधील इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा नुकताच सासवड येथे संपन्न झाला. स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठान, सासवड चे अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते संतोष जगताप यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. भविष्यातील विविध स्पर्धा परीक्षांचा पाया या शालेय स्पर्धा परीक्षा असून विद्यार्थ्यांनी विविध शालेय स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होऊन यश संपादन केले पाहिजे असे मत त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना व्यक्त केले. तसेच प्रतिष्ठानचे सचिव, जेष्ठ पत्रकार हेमंत ताकवले यांनी वाघीरे विद्यालय, सासवड या शाळेच्या उज्वल परंपरेबद्दल कौतुक करून भविष्यातही विविध क्षेत्रात या विद्यालयाचे विद्यार्थी चमकतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच शाळा पदाधिकारी व मार्गदर्शक शिक्षक यांचे त्यांनी कौतुक केले. स्व.एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून पुरंदर तालुक्यातील विविध शाळांमधील गरीब होतकरू विद्यार्थ्यांना मदत करून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले आहे. तसेच गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणातही अर्थसहाय्य देऊन समाजापुढे एक आदर्श निर्माण केला असून शिक्षण क्षेत्रातील या प्रतिष्ठानचे कार्य कौतुकास्पद आहे असे मत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे पुणे जिल्हा कार्यवाह शिवहार लहाने यांनी बोलताना व्यक्त केले.



इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत सासवड येथील वाघीरे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केल्याबद्दल विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेटू देऊन त्यांचे कौतुक केले.

■ **म.ए. सो. वाघीरे विद्यालयातील पुणे जिल्हा गुणवत्ता यादीतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी पुढीलप्रमाणे :**

इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयाचा वेदांत साबळे या विद्यार्थ्याचा ३०० पैकी २८४ गुण मिळवून गुणवत्ता यादीत राज्यात पाचवा क्रमांक आला आहे. तसेच यापूर्वी त्याची सैनिक स्कूल सातारा व नवोदय विद्यालय पुणे येथे प्रवेशासाठी निवड झाली आहे. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयातील एकूण ५१ विद्यार्थी पात्र झाले असून अनन्या भिसे (मिळालेले गुण २४२), पूर्वा रासकर (२४०), सार्थ शिंदे (२३६), आरुष राऊत (२२६),अनुराज चाचर (२२४), शुभ्रा जगताप (२२४) व स्वराज पवार (२१८) हे सात विद्यार्थी पुणे जिल्हा गुणवत्ता यादीत आले असून एकूण आठ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत.

इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयातील एकूण ८ विद्याथी पात्र झाले असून सिद्धी गजरे (२५८), अनघा जगताप (२२२) व सर्वेश लवांडे (२२२) हे तीन विद्यार्थी पुणे जिल्हा गुणवत्ता यादीतील असून शिष्यवृत्तीधारक झाले आहेत.